| | |
|---|---|
| MHOS090001412026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४५/२०२६ |
| | कौशल्याबाई विरुध्द निरंक |
| | निशाणी १ वरील आदेश |

२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कळंब, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारीः एन. एम. रेड्डी)

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४५/२०२६ निशाणी क्र. १

CNR No. MHOS09-000141-2026

## - न्यायनिर्णय -

**(घोषीत दिनांक २० मार्च, २०२६)**

सदरचा अर्ज अर्जदार यांनी ते व अर्जात नमुद वारस हे मयत सुबाबाई राजाराम जाधवर यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये दाखल केला आहे.

०२. अर्जदार कौशल्याबाई सखाराम मुंडे ही मयताची मुलगी, अर्जात नमुद वारस बालाजी राजाराम जाधवर हा मयताचा मुलगा, पंचफुला बाबुराव राख व सत्यभागा नामदेव चौरे या मयताच्या मुली, सुनिता रामहारी जाधवर ही मयताची सुन व गोविंद रामहारी जाधवर हा मयताचा नातु आहे. मयत सुबाबाई राजाराम जाधवर या दिनांक २४/०४/२०२५ रोजी मौजे लाडेवडगाव, ता. केज जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. मयत सुबाबाई राजाराम जाधवर यांना अर्जदार व अर्जात नमुद वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदाराने अर्ज मंजूर करुन वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

०३. वरील कथनास पुष्टी देण्यासाठी अर्जदाराने निशाणी ०९ नुसार पुरावा

प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. दस्त यादी निशाणी क्र. ०४ वरील अनुक्रमांक ०१ वर मयत सुबाबाई राजाराम जाधवर यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल करण्यात आली आहे. तसेच दस्त यादी निशाणी क्र. ०७ वरील अनुक्रमांक ०२ वर मयताचे पती राजाराम तुळशीराम जाधवर यांचे मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच दस्त यादी निशाणी क्र. १२ वरील अनुक्रमांक ०७ वर रामहरी राजाराम जाधवर यांचे मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणाची हरकत आहे का? हे बघण्याकरीता स्थानिक वृत्तपत्र दैनिक जनमत सर्वसामान्यांचे मध्ये दिनांक २९/०१/२०२६ निशाणी क्र.०८ नुसार जाहिर प्रगटन प्रसिध्द केले होते. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर या अर्जास मुदतीत कोणाचीही हरकत आली नसल्याचे दिसुन येते. त्याबाबतही कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही. सदरच्या अर्जामध्ये अर्जात नमुद वारस सुनिता रामहारी जाधवर ही मयताची सुन आहे. हिंदु वारसा कायदा, १९५६ च्या कलम १५ नुसार (1) The property of a female Hindu dying intestate shall devolve according to the rules set out in section 16,— (a) firstly, upon the sons and daughters (including the children of any pre-deceased son or daughter) and the husband; तसेच कलम १६ नुसार Order of succession and manner of distribution among heirs of a female Hindu.—The order of succession among the heirs referred to in section 15 shall be, and the distribution of the intestate’s property among

those heirs shall take place according to the following rules, namely:— Rule 1.—Among the heirs specified in sub-section (1) of section 15, those in one entry shall be preferred to those in any succeeding entry, and those included in the same entry shall take simultaneously. यावरुन असे दिसून येते की, मयत महिलेची सुन ही मयताची वर्ग-१ मधील वारस ठरू शकत नाही. सबब, अर्जात नमुद वारस सुनिता रामहारी जाधवर च्या हद्दीपुरता अर्ज नामंजूर करणे न्यायाचे ठरेल व इतर अर्जदार यांचा अर्ज, त्यांचे मयताशी असलेले नातेसंबंध, तसेच त्यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि पुरावा प्रतिज्ञापत्र विचारात घेवुन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार कौशल्याबाई सखाराम मुंडे व अर्जात नमुद वारस बालाजी राजाराम जाधवर, पंचफुला बाबुराव राख, सत्यभागा नामदेव चौरे, व गोविंद रामहारी जाधवर यांना ते मयत सुबाबाई राजाराम जाधवर यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे आवश्यक तो मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा. |
| ३. | अर्जात नमुद वारस सुनिता रामहारी जाधवर यांचा हद्दीपावेतो अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

NITIN MAHADEO REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.03.20 17:03:44 +0530

**( एन. एम. रेड्डी )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
कळंब.

दिनांक : २०/०३/२०२६
स्थळः कळंब

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original judgment.

Name of stenographer: Shri. D. B. Nikam, Stenographer-III,
Court Name : 2nd. Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Kallam.
Order/Judgment date: 20/03/2026
Order signed by the
Presiding Officer on : 20/03/2026
Order uploaded on : 20/03/2026